**अतिवार्धक्यामुळे आणि / किंवा शारीरिक व्याधी आणि दूर्धर आजारांमुळे दूर्बलता - विकलांगता - अक्षमताग्रस्त निवृत्तिवेतनधारकांना किंवा कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना त्यांच्या निवृत्तिवेतन किंवा कुटुंब निवृत्तिवेतनासंबंधीचे बँकींग व्यवहार हाताळण्यामध्ये येणा-या अडचणी दूर करणेसाठी कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.......**

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण २०२३/प्र.क्र.७७/कोषा-प्रशा५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ११ जून, २०२४

**वाचा** : (१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण १०.०५/प्र.क्र.१९६/कोषा प्रशा ५, दि.१२ डिसेंबर,२००७.

(२) उप लोक आयुक्त,महाराष्ट्र राज्य यांचेकडील दि.११ जुलै २०२३ रोजीची सुनावणी.

(३) अभिकर्ता बँकांद्वारे शासकीय निवृत्तिवेतनाचे संवितरण याबाबतचे भारतीय रिझर्व्ह बँक यांचे Master Circular RBI/2024-25/06 DGBA. GBD.No.S1/31.02.007/2024-25, Dated April 01, 2024.

**प्रस्तावना:**

अ) प्रचलित कार्यपध्दती प्रमाणे निवृत्तिवेतनाचे प्रदान संबंधित निवृत्तिवेतनधारकांच्या बँक खात्यांमध्ये करण्यात येत असून सदर बँक खात्यांमधून निवृत्तिवेतनधारक त्यांच्या गरजेप्रमाणे रकमा आहरीत करुन त्यांचा विनियोग करतात. निवृत्तिवेतनधारकांच्या सोयीसाठी उपरोक्त '*वाचा*' मधील अनुक्रमांक १ येथे नमूद शासन निर्णयान्वये निवृत्तिवेतन संवितरणासाठी निवृत्तिवेतनधारकाच्या आणि कुटूंब निवृत्तिवेतनाचे प्राधिकारपत्र ज्या व्यक्तीच्या नावे निर्गमित करण्यात आलेले आहे, त्या वैवाहीक जीवनसाथीदार व्यक्तीच्या नावे संयुक्त बँक खाते उघडण्यास अनुमती देण्यात आलेली आहे.

**ब)** अतिवार्धक्य किंवा स्मृतिभ्रंश (Dementia), स्मृतिनाश (Alzheimer), अर्धांगवायू (Paralysis), रुग्णशय्याधिनता (Bedriddenness) किंवा अन्य तत्सम शारीरिक व्याधी आणि दुर्धर आजारांच्या परिणामी आलेल्या शारीरिक - मानसिक दूर्बलता (Debility) - विकलांगता (Inability) - अक्षमता (Disability) इत्यादिंमुळे काही निवृत्तिवेतनधारक किंवा कुटूंब निवृत्तिवेतनधारक त्यांच्या निवृत्तिवेतनविषयक बँक खात्याचे व्यवहार व्यक्तीशः हाताळू शकत नाहीत. अशा निवृत्तिवेतनधारकांचे वैवाहीक जीवनसाथीदार हयात असतील, तर उपरोल्लेखित शासन निर्णयान्वये

अनुज्ञेय करण्यात आलेल्या संयुक्त बँक खाते सुविधेमुळे त्यांना निवृत्तिवेतनाच्या रकमा आहरित करण्यासाठी अडचणी येत नाहीत. तथापि, ज्या निवृत्तिवेतनधारकांचे वैवाहीक जीवनसाथीदार हयात नसतील किंवा त्यांचे वैवाहिक जीवनसाथीदार ( यथास्थिती पती / पत्नी ) देखील अशाच प्रकारच्या शारीरीक - मानसिक दूर्बलता - विकलांगता - अक्षमता यामुळे निवृत्तिवेतन विषयक संयुक्त बँक खात्याचे व्यवहार हाताळू शकत नसतील, अशा निवृत्तिवेतनधारकांना मात्र उपरोल्लोखित असमर्थतांमुळे किंवा अक्षमतांमुळे त्यांच्या निवृत्तिवेतन विषयक बँक खात्याचे व्यवहार करतांना अडचणी येत असून, हालअपेष्टांना सामोरे जावे लागत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. या संदर्भात उचित कार्यवाही करणेबाबत उपोदघातातील ***'वाचा'*** मधील अनुक्रमांक २ येथे नमूद सुनावणीच्या अनुषंगाने मा. उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून देखील निर्देश देण्यात आलेले आहेत.

क) या पार्श्वभूमीवर अतिवार्धक्य किंवा स्मृतिभ्रंश (Dementia), स्मृतिनाश (Alzheimer), अर्धांगवायू (Paralysis), रुग्णशय्याधिनता (Bedriddenness) किंवा अन्य तत्सम शारीरिक व्याधी आणि दुर्धर आजारांच्या परिणामी आलेल्या शारीरिक - मानसिक दूर्बलता (Debility) - विकलांगता (Inability) - अक्षमता (Disability) इत्यादिंमुळे निवृत्तिवेतन विषयक बँक खात्याचे व्यवहार करतांना निवृत्तिवेतनधारकांना सामोरे जावे लागत असलेल्या हालअपेष्टा आणि समस्या दूर करण्यासाठी आणि अशा निवृत्तिवेतनधारकांच्या सोयीसाठी प्रचलित विधिसंमत चौकटीमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची आणि त्याबद्दल स्पष्टता करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

**१)** ज्या निवृत्तिवेतनधारकांना किंवा कुटूंब निवृत्तिवेतनधारकांना अतिवार्धक्य किंवा स्मृतिभ्रंश (Dementia), स्मृतिनाश (Alzheimer), अर्धांगवायू (Paralysis),रुग्णशय्याधिनता (Bedriddenness) किंवा अन्य तत्सम शारीरिक व्याधी आणि दुर्धर आजारांच्या परिणामी आलेल्या शारीरिक - मानसिक दूर्बलता (Debility) - विकलांगता (Inability) - अक्षमता (Disability) इत्यादिंमुळे त्यांच्या निवृत्तिवेतन विषयक बँक खात्याचे व्यवहार व्यक्तीश: हाताळणे शक्य होत नसेल, अशा निवृत्तिवेतनधारकांनी उपोद्घातातील *'वाचा'* येथील अनुक्रमांक १ समोर नमूद शासन निर्णयान्वये कुटूंब निवृत्तिवेतनाचे प्राधिकारपत्र ज्या व्यक्तीच्या नावे निर्गमित करण्यात आलेले आहे, त्या वैवाहीक जीवनसाथीदार व्यक्तीच्या सोबत अनुज्ञेय असलेल्या संयुक्त बँक खाते सुविधेचा प्राधान्याने वापर करावा.

**२)** तथापि, उक्त परिच्छेद १ मध्ये नमूद परिस्थितीमुळे बाधित असलेल्या निवृत्तिवेतनधारकांचे किंवा कुटूंब निवृत्तिवेतनधारकांचे वैवाहिक जीवनसाथीदार ( यथास्थिती पती / पत्नी ) देखील अशाच प्रकारच्या शारीरिक - मानसिक दूर्बलता - विकलांगता - अक्षमता इत्यादिंमुळे निवृत्तिवेतन विषयक संयुक्त बँक खात्याचे व्यवहार हाताळू शकत नसतील अथवा त्यांचे वैवाहिक जीवनसाथीदार हयातच नसतील, अशा निवृत्तिवेतनधारकांना / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांना त्यांच्या निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन विषयक बँक खात्याचे व्यवहार

हाताळण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे विहित कार्यपध्दती किंवा '***प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९'*** *अंतर्गत पालक (Guardian)* नियुक्ती या दोन सुविधांपैकी त्यांना सोयीच्या असलेल्या कोणत्याही सुविधेचा वापर करता येईल.

**३) भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा विहित कार्यपध्दती :**

**३.१)** भारतीय रिझर्व्ह बँकेकडून 'अभिकर्ता बँकांद्वारा शासकीय निवृत्तिवेतनाचे संवितरण' यासंदर्भात अभिकर्ता बँकांना मुख्य परिपत्रकाद्वारे (Master Circular द्वारे) वेळोवेळी विस्तृत मार्गदर्शक सूचना प्रसृत केल्या जातात. अलीकडे असे मुख्य परिपत्रक दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेकडून निर्गमित करण्यात आलेले आहे. उपोदघातातील अनुक्रमांक ३ समोर नमूद भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मुख्य परिपत्रकाद्वारे **वृद्ध / आजारी / विकलांग / अक्षम निवृत्तिवेतनधारकांद्वारे निवृत्तिवेतनाचे आहरण** याबाबत परिच्छेद ७, ८ आणि ९ अन्वये खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

*" वृद्ध / आजारी / विकलांग / अक्षम निवृत्तिवेतनधारकांद्वारे निवृत्तिवेतनाचे आहरण .*

*परिच्छेद ७. आजारी आणि विकलांग निवृत्तिवेतनधारकांना बँकांमधून निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन काढताना येणाऱ्या समस्यांचे / अडचणींचे निराकरण करण्यासाठी, अभिकर्ता बँका अशा निवृत्तिवेतनधारकांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करू शकतात:*

- *असे निवृत्तिवेतनधारक, जे इतके आजारी आहेत की ते धनादेशावर स्वाक्षरी करण्यास असमर्थ आहेत / बँकेत प्रत्यक्ष शारीरिकरित्या उपस्थित राहण्यास असमर्थ आहेत.*
- *असे निवृत्तिवेतनधारक, जे काही शारीरिक दोष / अक्षमतेमुळे न केवळ बँकेत शारीरिकरित्या उपस्थित राहण्यास असमर्थ आहेत, किंबहूना धनादेश / पैसे काढण्याच्या फॉर्मवर त्यांच्या अंगठ्याचा ठसा उमटविण्यास देखील सक्षम नाहीत.*

*परिच्छेद ८. अशा वृद्ध / आजारी / अक्षम निवृत्तिवेतनधारकांना त्यांची बँक खाती हाताळता यावी यासाठी बँका खालीलप्रमाणे प्रक्रिया अवलंबू शकतात:*

- *जेथे वृद्ध / आजारी निवृत्तिवेतनधारकाच्या अंगठ्याचा किंवा पायाच्या बोटाचा ठसा घेण्यात येईल, तेथे तो एक जबाबदार बँक अधिकारी आणि बँकेला ज्ञात असलेली अन्य एक व्यक्ती अशा दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या समक्ष घेण्यात येईल.*
- *जेथे निवृत्तिवेतनधारक त्याच्या / तिच्या अंगठ्याचा / पायाच्या बोटाचा ठसा देखील उमटवू शकत नाही आणि बँकेत शारीरिकरित्या प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास देखील सक्षम नाही, तेथे धनादेश / पैसे काढण्याच्या फॉर्मवर एक जबाबदार बँक अधिकारी आणि बँकेला ज्ञात असलेली अन्य एक व्यक्ती अशा दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या समक्ष एक ठसा घेतला जाऊ शकेल.*

- *जबाबदार बँक अधिकारी त्याच बँकेमधील आणि प्राधान्याने ज्या शाखेमध्ये निवृत्तिवेतनधारकाचे निवृत्तिवेतन खाते आहे त्याच शाखेमधील अधिकारी असावा.*

*परिच्छेद ९. वर नमूद केल्याप्रमाणे धनादेश / पैसे काढण्याच्या फॉर्मच्या आधारे बँकेतून निवृत्तिवेतनाची रक्कम कोण काढणार आहे, हे बँकेच्या शाखेला अवगत करण्याबाबत देखील संबंधित निवृत्तिवेतनधारक यांना सांगण्यात येईल आणि त्या व्यक्तीची ओळख दोन स्वतंत्र साक्षीदारांद्वारे पटविण्यात येईल. बँकेतून प्रत्यक्ष रक्कम काढणाऱ्या सदर व्यक्तीस तिची स्वाक्षरी बँकेमध्ये सादर करण्यास सांगण्यात येईल. "*

**३.२)** उक्त परिच्छेद १ व २ मधील परिस्थितीने ग्रस्त निवृत्तिवेतनधारक किंवा कुटूंब निवृत्तिवेतनधारक उपरोल्लेखित परिच्छेद क्रमांक ३.१ मध्ये नमूद प्रचलित सुविधेचा वापर करु शकतील.

*४)* 'अभिकर्ता बँकांद्वारा शासकीय निवृत्तिवेतनाचे संवितरण' यासंदर्भात उपोद्घातातील अनुक्रमांक ३ समोर नमूद भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रमुख परिपत्रक (Master Circular) मधील परिच्छेद ७, ८ आणि ९ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदींचा मूळ इंग्रजी उतारा (Excerpt) सुलभ संदर्भासाठी या सोबत **सहपत्र १** म्हणून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**५)** उक्त परिच्छेद २ मध्ये नमूद परिस्थितीने ग्रस्त असलेल्या ज्या निवृत्तिवेतनधारकांना किंवा कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना काही अपरिहार्य कारणांमुळे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या उपरोल्लेखित प्रमुख परिपत्रक (Master Circular) मधील परिच्छेद ७, ८ आणि ९ अन्वये विहित करण्यात आलेली उपरोल्लेखित कार्यपध्दती अनुसरणे शक्य होणार नाही किंवा सोयीचे ठरणार नाही, अशा निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या शारीरिक - मानसिक दूर्बलता - विकलांगता - अक्षमता यांचा समावेश '***अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६' च्या कलम २ मधील (एस)*** अन्वये परिभाषित करण्यात आलेल्या बहु विकलांगतेच्या अंतर्गत होत असेल, तर, अशा निवृत्तिवेतनधारकांना / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना '***प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९'*** *च्या कलम १४, १५, १६ आणि १७* अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतुदींच्या अंतर्गत **'पालक (Guardian)'** या व्यवस्थेचा लाभ घेता येईल.

**६)** तथापि, '***प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९'*** *च्या कलम १४, १५, १६ आणि १७* अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतुदींच्या अंतर्गत **'पालक (Guardian)'** या व्यवस्थेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक निवृत्तिवेतनधारकांना / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना '***अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६' च्या कलम २ मधील (एस)*** अन्वये परिभाषित करण्यात आलेल्या बहु विकलांगतेच्या अंतर्गत विकलांगताग्रस्त असल्याचे सक्षम प्राधिकरणाचे समुचित प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. याबाबतची कार्यपध्दती सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र. अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दिनांक १४ सप्टेंबर,२०१८ अन्वये विहित

करण्यात आलेली आहे. सुलभ संदर्भासाठी सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१८०९१११७४०१०४४१७ असा आहे

*७) '**प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९**' च्या प्रयोजनार्थ '**पालक (Guardian)**'* म्हणून नियुक्ती (Appointment) आणि निरसन (Removal) याबाबतची कार्यपध्दती '***प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास नियम, २०००***' *मधील नियम १६ आणि १७ तसेच '**राष्ट्रीय न्यास विनियम, २००१**' मधील विनियम ११, १२ आणि १३ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदींनुसार विनियमित होईल.*

८) सुलभ संदर्भासाठी '***प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९***' *च्या कलम १४, १५, १६ आणि १७ अन्वये*विहित करण्यात आलेल्या तरतूदींचा मूळ इंग्रजी उतारा (Excerpt) या सोबत **सहपत्र २** म्हणून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच '***प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास नियम, २०००***' *मधील नियम १६ आणि १७ आणि* ***'राष्ट्रीय न्यास विनियम, २००१'*** *मधील विनियम १०, ११, १२ आणि १३* अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदींचा मूळ इंग्रजी उतारा (Excerpt) देखील सुलभ संदर्भासाठी या सोबत अनुक्रमे **सहपत्र ३** आणि **सहपत्र ४** म्हणून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

९) उक्त परिच्छेद ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे 'पालक (Guardian)' यांच्या माध्यमातून निवृत्तिवेतन घेण्याच्या सुविधेचा वापर करणा-या निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांच्या संदर्भात अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालय यांनी, निवृत्तिवेतनाची / कुटूंब निवृत्तिवेतनची रक्कम निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या बँक खात्यात जमा केल्यानंतर, शासनाची जबाबदारी राहणार नाही. सर्व प्रयोजनासाठी 'पालक (Guardian)' यांनी निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांच्या बँक खात्यामधून आहरीत अथवा हस्तांतरीत केलेली रक्कम ही निवृत्तिवेतनधारकाने / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाने आहरीत अथवा हस्तांतरीत केली आहे, असे समजण्यात येईल. 'पालक (Guardian)' यांनी निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या बँक खात्यामधून केलेल्या सर्व व्यवहाराची अंतिम जबाबदारी संबंधित निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारक यांची राहील.

१०) निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन फक्त निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या हयातीतच देय असल्याने त्यांच्या मृत्यूची माहिती संबंधित 'पालक (Guardian)' यांनी यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय तसेच संबंधित बँक यांना विनाविलंब व कोणत्याही परिस्थितीत मृत्यूच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत कळविणे बंधनकारक राहील. अशा माहिती अभावी बँक खात्यात निवृत्तिवेतनाची / कुटूंब निवृत्तिवेतनाची रक्कम जमा केली गेल्यास ते अतिप्रदान असेल व सदर अतिप्रदानाची रक्कम परत करण्याची

जबाबदारी 'पालक (Guardian)' यांची राहील. तसेच संबंधित निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूबाबत सूचना प्राप्त झाल्याबरोबर संबंधित बँकेकडून संबंधित बँक खात्याचे व्यवहार तात्काळ स्थगित करण्यात येतील. निवृतीवेतनधारकाच्या/ कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकानंतर माहितीअभावी त्यांच्या बॅक खात्यात निवृत्तिवेतनाची रक्कम जमा केली गेल्यास, ते अतिप्रदान असेल व सदर अतिप्रदानाची रक्कम बँकेकडून शासनास परत करणे आवश्यक राहील.

**११)** निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यू समयी त्यांच्या बँक खात्यामध्ये शिल्लक असणाऱ्या रक्कमा, अथवा मृत्यू दिनांकानंतर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय यांनी अनावधानाने अशा निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या बँक खात्यामध्ये जमा केलेल्या रक्कमा 'पालक (Guardian)' यांना आहरित करता येणार नाहीत. मृत निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या बँक खात्यामध्ये मृत्यू समयी शिल्लक असलेल्या रकमा आहरित करण्यासाठी प्रथम यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे ही 'पालक (Guardian)' यांची आणि संबंधित बँकेची जबाबदारी राहील. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालय यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर; अशा रक्कमा प्रचलित पध्दतीनुसार निवृत्तिवेतनधारकाने / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाने नामनिर्देशन केले असल्यास, नामनिर्देशित व्यक्तीस प्रदान करता येतील आणि नामनिर्देशन केले नसल्यास कायदेशीर वारसदारास रक्कमांचे प्रदान करण्यात येईल.

**१२)** उक्त कार्यपध्दतीचे पालन न झाल्यामुळे शासकीय रकमांची हानी झाली तर, त्या रक्कमा शासन खाती भरण्याची संपूर्ण जबाबदारी ही 'पालक (Guardian)' यांची राहील. शासकीय अतिप्रदानाची रक्कम निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या बँक खात्यातून किंवा 'पालक (Guardian)' यांच्या नांवे असलेल्या अन्य वैयक्तिक खात्यातून वसूल करण्यात येईल.

**१३)** मूळ निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारक आणि 'पालक (Guardian)' हे दि.१ मे आणि १ नोंव्हेबर रोजी हयात असल्याचा दाखला यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालय यांना त्या महिन्याचे निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन अदा करण्यापुर्वी म्हणजेच दिनांक १५ मे आणि १५ नोव्हेंबर पर्यंत सादर करण्याची जबाबदारी ही 'पालक (Guardian)' *यांची* राहील. 'पालक (Guardian)' यांच्या माध्यमातून निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन घेणाऱ्या एकूण निवृत्तिवेतनधारकांपैकी / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांपैकी कमीत कमी एक दशांश (१/१०) निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांच्या बाबतीत ते हयात असल्याची खात्री व्हिडीओ कॉलींग (VC) द्वारे यथास्थिती सहायक अधिदान व लेखा अधिकारी (निवृत्तिवेतन), अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा अपर कोषागार अधिकारी (निवृत्तिवेतन), जिल्हा कोषागार कार्यालय यांचेकडून प्रतिवर्षी न चुकता करण्यात यावी आणि

त्याचा अहवाल संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक ३१ मे आणि ३० नोव्हेंबर पूर्वी पाठविण्यात यावा.

**१४)** व्हिडीओ कॉलींग (VC) द्वारे निवृत्तिवेतनधारकाची / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाच्या हयातीची खात्री करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालय यांनी निवृत्तिवेतन प्रणालीमार्फत याद्दच्छिक (Random) स्वरुपात एक दशांश (१/१०) निवृत्तिवेतनधारकांची / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांची निवड करावी. त्यांच्या हयातीच्या तपासणीसाठी 'पालक (Guardian)' यांना दिनांक व वेळ कळविण्यात यावी. व्हिडीओ कॉलींग (VC) साठी निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांच्या बाजूने आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी 'पालक (Guardian)' यांची राहील.

**१५)** जर 'पालक (Guardian)' यांना व्हिडीओ कॉलींगद्वारे (VC) तपासणी करुन घेण्यास अडचणी येत असतील तर, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालयातील लिपीक / पर्यवेक्षक यांनी निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांच्या घरी जावून निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारक हयात असल्याची तपासणी करावी. याकरीता रु.५००/- इतके तपासणी शुल्क आणि प्रवास खर्च रु.८/- प्रती किलोमीटर या दराने आकारणी करण्यात यावी. तपासणी शुल्क आणि प्रवास खर्च विषयी लागू असलेल्या रकमेचा भरणा 'पालक (Guardian)' यांना करावा लागेल. त्यासंदर्भातील रितसर पावती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालयाकडून देण्यात येईल. तपासणी शुल्क आणि प्रवास खर्च रक्कम वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक १०११/प्र.क्र. ८८/कोषा प्रशा-५, दिनांक २२ जानेवारी २०१३ मधील नमूद लेखाशिर्षाखाली शासनाच्या प्रचलित नियामप्राणे जमा करण्यात यावी.

**१६)** निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारक आणि 'पालक (Guardian)' यांचा रहिवासाचा परिपूर्ण पत्ता, संपर्कासाठी ई-मेल, दुरध्वनी क्रमांक विषयक अद्ययावत माहिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालयास पुरवण्याची प्राथमिक जबाबदारी 'पालक (Guardian)' यांची राहील. जर व्हिडीओ कॉलींग (VC) साठी निवडलेल्या निवृत्तिवेतनधारकाचा / कुटूंब निवृत्तिवेतनधारकाचा संपर्क होऊ शकला नाही तर, संबधितांचे निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन संपर्क होईपर्यंत स्थगित करण्यात येईल.

**१७)** ज्या निवृत्तिवेतनधारकांना / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांना 'पालक (Guardian)' यांच्या माध्यमातून निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन घेण्याच्या सुविधेचा लाभ घ्यावयाचा असेल, त्यांनी अथवा त्यांचे वारसदार किंवा प्रस्तावित 'पालक (Guardian)' यांनी या विषयीच्या सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन समुचित प्रस्ताव यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय येथे सादर करावा. सदर प्रस्तावासमवेत खालील कागदपत्रे सादर करावीत:

अ) निवृत्तिवेतनधारकांचे वैवाहिक जीवनसाथीदार हयात असल्यास (यथास्थिती पती / पत्नी) ***वृद्ध / आजारी / विकलांग / अक्षम*** असल्यामुळे बँक खात्याचे व्यवहार करण्यास सक्षम नसल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक किंवा वैद्यकीय अधिक्षक यांचे प्रमाणपत्र आणि हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र ;

ब) निवृत्तिवेतनधारक बहु विकलांगताग्रस्त असल्याचे सक्षम प्राधिकरणाचे समुचित प्रमाणपत्र;

*क)* ***'प्रमस्तिष्क घात, मानसिक मंदता आणि बहु विकलांगताग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९'*** *च्या कलम १३ अंतर्गत गठित स्थानिक स्तर समितीने* 'पालक (Guardian)' *म्हणून नियुक्त केल्याचे प्रमाणपत्र / आदेश ;*

ड) 'पालक (Guardian)' यांचे सहपत्र ५ मधील वचनपत्र;

इ) 'पालक (Guardian)' यांच्या *पॅनकार्ड / आधारकार्ड / मतदार ओळखपत्र / वाहन चालक परवाना / पारपत्र इत्यादि पैकी एका* ओळखपत्राची छायांकीत प्रत;

**१८)** सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी (निवृत्तिवेतन), अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार अधिकारी यांनी 'पालक (Guardian)' यांच्या माध्यमातून निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन घेण्याबाबतच्या प्रस्तावाची छाननी करुन कामकाजाच्या पाच दिवसामध्ये सदर सुविधा वापरण्यास अनुमती देण्याबाबत निर्णय घ्यावा. सदर सुविधा वापरण्याच्या कार्यपध्दतीमध्ये, 'पालक (Guardian)' यांचे प्राप्त वचनपत्र आणि नियुक्तीपत्र हे दीर्घकालीन महत्त्वाचे दस्तऐवज असल्याने त्यांच्या मूळ प्रती स्वतंत्र नस्तीमध्ये क्रमवार लावून ठेवाव्यात आणि छायांकीत प्रती संबंधीत निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन प्रदान आदेशासोबतच्या कागदपत्रास जोडाव्यात. अशा छायांकीत प्रतींवर मूळ प्रती जतन केल्याचा नस्ती क्रमांक व त्यामधील वचनपत्र आणि नियुक्तीपत्र यांचा संदर्भ नमूद करुन ठेवावा.

**१९)** 'पालक (Guardian)' यांच्या *माध्यमातून* निवृत्तिवेतन / कुटूंब निवृत्तिवेतन घेणाऱ्या निवृत्तिवेतनधारकांची माहिती निवृत्तिवेतन प्रणालीत संकलीत करण्यात यावी. यासाठी संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी निवृत्तिवेतनवाहिनी प्रणालीमध्ये समूचित सुविधा विकसित करुन घ्यावी.

**२०)** प्रस्तुत शासन निर्णय तात्काळ प्रभावाने अंमलात येईल. यासंदर्भात महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मध्ये आवश्यक त्या सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

प्रस्तुत शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभाग, यांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०२४/प्र.क्र.६/दि.क.२, दिनांक ०५.०२.२०२४ तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, यांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.०३/२०२४/आरोग्य-६, दिनांक ७ जून २०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२४०६१११८१०४००५०५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37A42E182BACE4C129ABBEB54E27836D32D401560638F644A547867205474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2024.06.11 18:25:20 +05'30'

**( डॉ. राजेंद्र गाडेकर )**
**शासनाचे उप सचिव ,**

**प्रति ,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य,
८. अ.मु.स. / प्र. स. / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१०.प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई,
१२.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१५.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१७.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई,
१८.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई,
२०.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,
२२.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२३.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२४.सर्व विभागीय आयुक्त,

२५.सर्व जिल्हाधिकारी,

२६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२७.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

२८.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२९.प्रादेशिक सह संचालक,लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर,

३०.संचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई,

३१.प्रादेशिक सह संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर,

३२.वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती /नागपूर

३३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

३४.वित्त विभागातील सर्व कार्यासने,

३५.निवड नस्ती कोषा. प्रशा.५

## सहपत्र १

**Excerpt from RBI's Master Circular RBI/2024-25/06 DGBA. GBD.No.S1/31.02.007/2024-25, Dated April 01, 2024.**

**Withdrawal of pension by old / sick / disabled / incapacitated pensioners**

7. In order to take care of problems/ difficulties faced by sick and disabled pensioners in withdrawal of pension / family pension from the banks, agency banks may categorize such pensioners as under:

   (a) Pensioner who is too ill to sign a cheque / unable to be physically present in the bank.

   (b) Pensioner who is not only unable to be physically present in the bank but also not even able to put his/her thumb impression on the cheque / withdrawal form due to certain physical defect /incapacity.

8. With a view to enabling such old/sick/incapacitated pensioners to operate their accounts, banks may follow the procedure as under:

   (a) Wherever thumb or toe impression of the old / sick pensioner is obtained, it should be identified by two independent witnesses known to the bank, one of whom should be a responsible bank official.

   (b) Where the pensioner cannot even put his/her thumb/ toe impression and also would not be able to be physically present in the bank, a mark can be obtained on the cheque / withdrawal form, which should be identified by two independent witnesses, one of whom should be a responsible bank official.

   The responsible bank official has to be from the same bank, preferably from the same branch, where the pensioner is having his/her pension account.

9. The pensioner may also be asked to indicate to the bank as to who would withdraw the pension amount from the bank on the basis of cheque / withdrawal form as obtained above and that person should be identified by two independent witnesses. The person who would be actually drawing the money from the bank should be asked to furnish his signature to the bank.

# सहपत्र २

**Excerpt from The National Trust For The Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999**

## 14. Appointment of guardianship -

(1) A parent of a person with disability or his relative may make an application to the local level committee for appointment of any person of his choice to act as a guardian of the persons with disability.

(2) Any registered organization may make an application in the prescribed form to the Local Level Committee for appointment of a guardian for a person with disability.

Provided that no such application shall be entertained by the local level committee, unless the consent of the guardian of the disabled person is also obtained.

(3) While considering the application for appointment of a guardian, the local level committee shall consider-

- whether the person with disability needs a guardian;
- the purposes for which the guardianship is required for person with disability.

(4) The local level committee shall receive, process and decide applications received under sub-sections (1) and (2), in such manner as may be determined by regulations:

Provided that while making recommendation for the appointment of a guardian, the local level committee shall provide for the obligations which are to be fulfilled by the guardian.

(5) The local level committee shall send to the Board the particulars of the applications received by it and orders passed thereon at such interval as may be determined by regulations.

## 15. Duties of Guardian –

Every person appointed as a guardian of a person with disability under this Chapter shall, wherever required, either have the care of such persons of disability and his property or be responsible for the maintenance of the person with disability.

## 16. Guardian to furnish inventory and annual accounts -

(1) Every person appointed as a guardian under section 14 shall, within a period of six months from the date of his appointment, deliver to the authority which appointed him, an inventory of immovable property belonging to the person with disability and all assets and other movable property received on behalf of the person with disability, together with a statement of all claims due to and all debts and liabilities due by such person with disability.

(2) Every guardian shall also furnish to the said appointing authority within a period of three months at the close of every financial year, an account of the property and assets in his charge, the sums received and disbursed on account of the person with disability and the balance remaining with him.

## 17. Removal of Guardian-

(1) Whenever a parent or a relative of a person with disability or a registered organization finds that the guardian is-

(a) abusing or neglecting a person with disability; or

(b) misappropriating or neglecting the property, it may in accordance with the prescribed procedure apply to the committee for the removal of such guardian.

(2) Upon receiving such application the committee may, if it is satisfied that there is a ground for removal and for reasons to be recorded in writing, remove such guardian and appoint anew guardian in his place or if such a guardian is not available make such other arrangements as may be necessary for the care and protection of person with disability.

(3) Any person removed under sub-section (2) shall be bound to deliver the charge of all property of the person with disability to the new guardian, and to account for all moneys received or disbursed by him.

**Explanation** -For the purposes of this Chapter, the expression "relative" includes any person related to the person with disability by blood, marriage or adoption.

# सहपत्र ३

## Excerpt from The National Trust For The Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Rules, 2000

### 16. Application for guardianship-

(1) The application by a parent, relative or registered organization for appointment of guardian for a person with disability shall be made to the local level committee in Form A.

(2) The confirmation of appointment of guardian on such application shall be made in Form B.

(3) A quarterly report in the prescribed format shall be given by the local level committee to the Board or to the State level agency authorized by the Board giving particulars of the applications received and orders passed thereon.

### 17. Procedure for removal of Guardian-

(1) (i) The local level committee upon receiving an application for removal of a guardian from a parent or a relative of a person with disability or a registered organization on the grounds specified in clauses (a) and (b) of sub-section (1) of section 17 of the Act, shall appoint a team of investigators consisting not less than three persons.

(ii) The team shall consist of one representative of parent organization, one representative of the association for the disabled and one Government official associated with disability not I below the rank of Assistant Director.

(iii) While taking a decision on the appointment of guardian, the local level committee shall ensure that the person whose name has been suggested for appointment as guardian is :

(a) a citizen of India;
(b) is not of unsound mind or is currently undergoing treatment for mental illness;
(c) does not have a history of criminal conviction;
(d) is not a destitute and dependent on others for his own living; and (e) has not been declared insolvent or bankrupt.

(iv) In case of an institution or organization being considered by the local level committee for appointment as a guardian, the following guidelines shall be followed :

(a) the institution should be recognized by the State or the Central Government;

(b) the institution should have a minimum of 2 years' experience in offering disability rehabilitation services including running residential facilities or hostel to the respective c' category of persons with disability;

(c) the residential facility or hostel for persons with disabilities shall maintain minimum standards in terms of space, staff, furniture, rehabilitation and medical facilities as specified by the Board.

(v) The team of investigators while investigating a complaint for assessing the abuse or neglect of a person with disability shall follow the guidelines specified by the Board.

(vi) The following Acts of commission or omission shall constitute abuse or neglect on the part of the guardian, namely -

(a) solitary confinement of person with disability in a room for longer period of time;

(b) chaining of the person with disability;

(c) beating or treating a person with disability resulting in bruises, skin
or tissue damage (not due to his injurious behaviour indulged by the persons with disabilities);

(d) sexual abuse;

(e) long deprivation of physical needs such as food, water and clothing; (f) no provision or non-compliance of rehabilitation or training programmes as specified by experts in the field of disability rehabilitation;

(g) misappropriation or misutilisation of the property of the person with disability; and (h) lack of facilities or no provision of trained or adequate staff for meeting the training and management needs of the persons with disabilities.

(2) The team of investigators shall submit their report within a period of ten days.

(3) Upon receiving the report of the investigation team, the local level committee shall take the final decision within the period of ten days on the removal of the guardian against whom the complaint has been received after giving the said guardian an opportunity of being heard.

(4) The local level committee shall record in writing its reasons for removal of the guardian or rejection of the application.

# सहपत्र ४

## Excerpt from The National Trust Regulations, 2001

**10. Who may apply for guardianship –**

(1) Both the parents may jointly, or, in the event of the absence of one due to death, divorce, legal separation, desertion or conviction, may singly apply for guardianship of their or as the case may be his ward beyond the age of 18 years.

(2) In the event of death, desertion, conviction of both the parents, the siblings (including half and step siblings) jointly or singly (reason of single application to be explained separately) may apply for guardianship of a disabled member of the family.

(3) In the event of non-application of sub-regulation (1) and (2) above, a relative may make an application for guardianship.

(4) In the event of non-application of sub-regulation (1), (2) and (3), any registered organization may make an application for guardianship.

(5) The Local Level Committee may direct a registered organization to make an application for guardianship in case of a destitute or abandoned person.

**11. Who may be indicated by applicant as guardian –**

(1) Both the parents jointly, or, singly in the event of the absence of one due to death, divorce, legal separation, desertion or conviction, being natural guardian of minor may apply to the Local Level Committee to get themselves or himself as the case may be, appointed as guardian of their or as the case may be, his disabled ward beyond the age of 18, in which case the application shall be accepted unless the parent is disqualified on account of i. loss of citizenship; ii. being of unsound mind; iii. being convicted by a court of law; or iv. being a destitute.

(2) The applicant may indicate siblings, or any member of the family or any other person or a registered institution for consideration as a guardian and in case of institutions, the conditions of eligibility of institutions shall be as stipulated in subregulations (3), (4) and (5).

(3) In the case of considering the institution as a guardian, the institution must be registered under a law and be capable of providing care of the person.

(4) In the event of institution ceasing to be registered under a law or stops functioning, or is found otherwise unsuitable, the Local Level Committee shall make alternative arrangements for the foster care of any such inmate or the ward, who is under the care of any such institute.

(5) The alternative care under sub-regulation (4) shall not be permanent in nature and shall be placed by permanent guardianship within a period of one year.

(6) The applicant must be living in the vicinity or close proximity to the place where the ward has been habitually living at the time of appointment of guardian.

(7) No single male shall be considered as a guardian for a female ward and in the case of female wards, the male person shall be given co-guardianship with his spouse, who shall be master co- guardian.

**12. Guidelines for receiving, processing and confirmation of application for appointment of a guardian –**

(8) The Local Level Committee shall receive applications for appointment of guardian in Form A under the rules.(Amended vide GSR 123(E) dated 16th February 2004).

(9) On receipt of the application for appointment of guardian, the Local Level Committee shall scrutinize the application and call for any supporting document or information that may be necessary for deciding the issue of guardianship.

(10)In case of application received from parents for guardian other than themselves, the Local Level Committee may decide to get parent's counselling in any manner, it may decide to determine the genuineness of having a guardian other than parents.

(11)If parents or relatives are not available for the person with disability who is in need of guardian, because of being a vagrant or destitute or found abandoned, member or members of the Committee may ask for applications from a registered organization to initiate the process of guardianship for the person.

(12)The person with disability must be assessed by the Local Level Committee, to determine the genuineness of the need of guardianship and it shall be open to the Local Level Committee to seek the assistance of technical personnel or their services to determine the need.

(13)The Local Level Committee shall satisfy itself about the capabilities and the suitability of the person on whom guardianship is being conferred.

(14)The application for guardianship for personal care and maintenance shall be accepted to cover the following areas, namely -

(15)Food, clothing and shelter needs;

(16)Health care needs;

(17)Religious needs;

(18)Education, training and employment needs;

(19)Leisure and nutrition needs;

(20)Protection from exploitation and abuse;

(21)Protection of constitutional and human rights; and

(22)Medical and surgical needs.

(23)The confirmation of appointment of the guardian on application made by (1) a registered organization; or (2) the parent or relative of a person with disability shall be made in Form B under the rules. (Amended vide GSR 123(E) dated 16th February 2004).

## सहपत्र ५

पालक (Guardian) यांचे वचनपत्र

| पालक (Guardian) यांचा फोटो |
|---|

| | | |
|---|---|---|
| १. | निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाचे नाव | : |
| २. | सेवानिवृत्तिपूर्वीच्या कार्यालयाचे नाव | : |
| ३. | जिल्हा कोषागार कार्यालयाचे नाव | : |
| ४. | निवृत्तिवेतन प्रदान आदेश (पीपीओ) क्रमांक | : |
| ५. | बँकेचे नाव व शाखा | |
| ६. | बँक खाते क्रमांक | |
| ७. | पालक (Guardian) यांचे नाव | : |
| ८. | पालक (Guardian यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता | : |
| ९. | पालक (Guardian यांचा भ्रमणध्वनी क्रमांक | : |
| १०. | पालक (Guardian यांचा ई-मेल पत्ता | : |
| ११. | पालक (Guardian यांचा फोटो ओळखपत्र क्रमांक | : |
| १२. | पालक (Guardian यांचा पॅन कार्ड क्रमांक | : |
| १३. | निवृत्तिवेतनधारक, कुटुंबनिवृत्तिवेतनधारकासोबत नाते (असल्यास) | : |

(फोटो ओळखपत्राकरिता वैध कागदपत्रे : आधार कार्ड, मास्क आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळख पत्र, वाहन चालक अनुज्ञप्ती, पारपत्र, शासकीय-निमशासकीय कार्यालयाचे ओळखपत्र, बँकेने फोटो साक्षांकित केलेले पासबूक पृष्ठ/प्रमाणपत्र.)

मी श्री./श्रीमती.................................................. निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक श्री/श्रीमती....................................... यांचा / यांची पालक (Guardian) या नात्याने पुढीलप्रमाणे वचन देतो की :

अ) प्रतिवर्षी १ मे व १ नोव्हेंबर रोजी निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक हयात असल्याचे प्रमाणपत्र (हयातीचा दाखला) विहित नमुन्यात प्रत्येक वर्षी दिनांक १५ मे आणि दिनांक १५ नोव्हेंबर पर्यंत अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालयास सादर करण्यात येईल.

आ) विहित नमुन्यातील हयातीच्या दाखल्यावर निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक श्री./ श्रीमती..............................................., यांच्या डाव्या हाताचे ठसे देण्यात येतील. तसेच पालक (Guardian) म्हणून माझी स्वाक्षरी करण्यात येईल.

इ) सदर हयातीचा दाखला प्रत्येक वर्षी दिनांक १५ मे आणि दिनांक १५ नोव्हेंबर पर्यंत अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयास सादर केल्यानंतरच निवृत्तिवेतन / कुटुंबनिवृत्तिवेतन नियमितपणे अदा होईल, याची मला जाणीव आहे.

ई) निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन हे केवळ निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांच्या हयातीतच देय असल्याने, जर निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या मृत्यूची माहिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालयास तसेच संबंधित बँकेच्या शाखेस मृत्यू दिनांकापासून एका महिन्याच्या आत कळविण्याची जबाबदारी निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांचा पालक (Guardian) या नात्याने माझी राहील, याची मला जाणीव आहे.

उ) निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांच्या मृत्यूपश्चात निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनाची अतिप्रदानित रक्कम अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालयास परत करण्याची जबाबदारी माझी राहील, याची मला जाणीव आहे.

**दिनांक :**

**ठिकाण :**

निवृत्तिवेतनधारक, कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांची स्वाक्षरी / डाव्या अंगठ्याचा ठसा

पालक (Guardian) यांची स्वाक्षरी